| वर्ष - 7 । अंक - 319 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 9 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews






## मावळात घडामोडींना वेग, आघाडीच्या मेळाव्याला काँग्रेसची दांडी

# अजितदादा आले बारणेंच्या प्रचाराला!

## आता पार्थ पवार येणार का?; युतीच्या बैठकीला सर्वांची झाडून हजेरी

पिंपरीः । महाईन्यूज

**मावळ लोकसभेतील युतीचे (शिवसेना) उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी मित्रपक्ष राष्ट्रवादीचे अजित पवार हे सोमवारी (ता. 8) पिंपरीत येऊन गेले. त्यांनी युतीच्या पहिल्या संयुक्त बैठकीला हजेरी लावली. त्यांचे पुत्र पार्थ यांचा गत लोकसभेला बारणेंनी पराभव करूनही ते आल्याने त्याची मोठी चर्चा झाली. उमेदवार म्हणून आता पार्थ यांनाही प्रचारासाठी बोलावणार असल्याचे बारणे यांनी या बैठकीनंतर सांगितले. त्यामुळे पार्थ यांच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.**



> “ राजकारणात स्थित्यंतरे होत असल्याने मनाला लावून घ्यायचे नसते. चिंचवडचे दिवंगत भाजप आमदार लक्ष्मण जगतापांविरोधात मी 2009 च्या विधानसभेला लढलो होतो. 2014 च्या लोकसभेलाही ते माझे प्रतिस्पर्धी होते. पण, 2019 च्या लोकसभेला, त्यांनी माझे काम केले, प्रचार केला होता. त्यामुळे आताही येणाऱ्या काळात असेच चित्र दिसेल.
>
> **-श्रीरंग बारणे**

**ग्राऊंड रिपोर्ट**

अजितदादा हा मनात कटूता न ठेवणारा मोठा नेता असून ते न बोलवताही स्वतःहून आल्याने पार्थही येतील, असा दावा बारणेंनी केला. माझी उमेदवारी जाहीर होताच स्वतः फोन करीत कधी सभा, बैठक आहे, मी येतो असे अजितदादा म्हणाले होते, असेही बारणेंनी यावेळी आवर्जून सांगितले. मात्र, पार्थ हे त्यांच्या मातोश्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी बारामतीत लोकसभा मतदारसंघात व्यस्त आहेत. त्यामुळे ते मावळात येतील का, याची उत्सुकता मावळकरांना लागली आहे.

दरम्यान, रविवारी मावळमधील महाविकास आघाडीचा मेळावा पिंपरी-चिंचवडमध्ये पार पडला. त्या मेळाव्यावर काँग्रेसने बहिष्कार टाकल्याने त्याला गालबोट लागले. तर, सोमवारी शहरात मावळ युतीची बैठक दणक्यात झाली. त्याला सर्वपक्ष व त्यांच्या नेत्यांनीही झाडून हजेरी लावली होती.

बारणेंच्या उमेदवारीला टोकाचा विरोध केलेले मावळचे अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळकेंसह मावळमधून इच्छुक असलेले माजी राज्यमंत्री भाजपचे बाळा भेगडे हे सुद्धा उपस्थित होते.

अजितदादा येणार असल्याने नेहमीसारखी पक्षाची शहरातील सारी नेतेमंडळी व प्रमुख कार्यकर्तेही हजर होते.

---

## पिंपरी-चिंचवडमध्ये शोभायात्रेमध्ये मिलिंद एकबोटेंच्या उपस्थितीस विरोध

## शहरातील तमाम आंबेडकरवादी पक्ष संघटनांचा शोभायात्रा होऊ न देण्याचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडी यमुनानगर येथे गुढीपाडव्या निमित्त भारतीय संस्कृती मंचच्या वतीने उद्या ९ एप्रिल रोजी शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून भीमा-कोरेगाव हल्ल्यातील प्रमुख आरोपी मिलिंद एकबोटे यांना आमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती एका प्रसिद्धी पत्राच्या माध्यमातून मिळाली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील तमाम आंबेडकरवादी पक्ष संघटनांनी त्यांच्या उपस्थितीस विरोध आहे.**



### यांनी दिला इशारा...

» तरी तात्काळ सदर कार्यक्रमाचा परवाना नाकारावा, अन्यथा पिंपरी चिंचवड शहरातील तमाम आंबेडकरी पक्ष संघटना कार्यक्रमाच्या स्थळी मिलिंद एकबोटे विरोधात निदर्शने करतील असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे शहर संघटक प्रमोद क्षिरसागर, भाजपाचे शहर चिटणीस सचिन काळभोर, वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रसिद्धी प्रमुख बुद्धभूषण अहिरे, सामाजिक कार्यकर्त्या मेघा आठवले यांनी निगडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना दिलेल्या पत्रात दिला आहे.

वंचित बहुजन युवा आघाडीचे शहर संघटक प्रमोद क्षिरसागर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, मिलिंद एकबोटे सातत्याने प्रक्षोभक वक्तव्य करत धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रकार करत आहे. भीमाकोरेगाव हल्ला प्रकरणात त्याच्यावर मुख्य आरोप असुन चिथावणीखोर वक्तव्य करून दंगली भडकण्याची कामे केल्याचे अनेकदा प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्ध झाले आहे. लोकसभेच्या निवडणूकीच्या आचारसंहितेच्या काळात अश्या प्रकारे वादग्रस्त आरोपींना आमंत्रित करून समाजातील शांतता भंग करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न आयोजकांच्या माध्यमातून केला जात आहे.

# शरद पवारांचा पलटवार!

## » तुमच्या धमक्यांना भीक न घालणारी ही अवलाद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून धमक्या दिल्या जात असल्याची चर्चा सुरू असताना खुद्द शरद पवार यांनीच सुपे येथील भर सभेत 'घड्याळाला मतदान केले नाही तर पाणी मिळणार नाही, कारखान्याला ऊस जाणार नाही.**

असा मजकूर असलेली चिठ्ठी वाचून दाखवली.अशा धमक्यांना घाबरू नका, त्यांना दुरुस्त करण्याची वेळ आता आली आहे', या शब्दात त्यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे वाभाडे काढले. कितीही धमक्या द्या, तुमच्या धमक्यांना भीक न घालणारी ही अवलाद आहे, असे शरद पवार गरजले.शरद पवार यांनी आज बारामतीच्या जिरायत भागाचा दौरा केला. जनाई-शिरसाई पाणी योजनांसंबंधी शरद पवार यांनी या दौऱ्यात भाष्य केले. राष्ट्रवादीतील फुटीनंतर तालुक्यात या सिंचन योजनेवरूनच आता श्रेयवाद सुरु झाला आहे. जनाई-शिरसाई योजनेच्या कामाची जबाबदारी मी ज्यांच्यावर दिली होती, त्यांनी ती पार पाडली नाही. मी गेली २० वर्षे स्थानिक विषयात लक्ष घालत नव्हतो. परंतु आता लक्ष घालून मी माझी जबाबदारी पार पाडेन, असे पवार यांनी स्पष्ट केले.



बारामतीच्या जिरायत भागाने नेहमीच मला भरभरून प्रेम दिले आहे. त्यामुळे या माझ्या माणसांचे प्रश्न सोडवणे ही माझीच जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याबाबत विरोधकांकडून वेळोवेळी त्यांच्या वयावरून टिप्पणी केली जाते. याबाबत शरद पवार यांनी मिश्किल टिप्पणी करत विरोधकांना टोला लगावला आहे. शरद पवार म्हणाले की, अनेकजण ८४, ८५ वय झाले असे म्हणतात. तुम्ही वय काढू नका, तुम्ही अजून काय पाहिले आहे?, हा गडी थांबणारा नाही. ज्या लोकांनी साथ दिली, त्या लोकांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेवटच्या श्वासापर्यंत जनहिताची कामे करत राहील, अशी ग्वाही पवार यांनी दिली.कृषिमंत्री असताना नरेंद्र मोदी यांच्या गुजरात राज्याला प्रचंड मदत केली. ते कोणत्या पक्षाचे आहेत यापेक्षाही एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि त्या राज्यातील शेतकरी सुखी करण्यासाठी मदत केली पाहिजे.

### हा गडी थांबणारा नाही

» असा मजकूर असलेली चिठ्ठी वाचून दाखवली.अशा धमक्यांना घाबरू नका, त्यांना दुरुस्त करण्याची वेळ आता आली आहे', या शब्दात त्यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे वाभाडे काढले. कितीही धमक्या द्या, तुमच्या धमक्यांना भीक न घालणारी ही अवलाद आहे, असे शरद पवार गरजले.शरद पवार यांनी आज बारामतीच्या जिरायत भागाचा दौरा केला. जनाई-शिरसाई पाणी योजनांसंबंधी शरद पवार यांनी या दौऱ्यात भाष्य केले. राष्ट्रवादीतील फुटीनंतर तालुक्यात या सिंचन योजनेवरूनच आता श्रेयवाद सुरु झाला आहे. जनाई-शिरसाई योजनेच्या कामाची जबाबदारी मी ज्यांच्यावर दिली होती, त्यांनी ती पार पाडली नाही. मी गेली २० वर्षे स्थानिक विषयात लक्ष घालत नव्हतो.

# रावेरमधून लढण्यास रोहिणी खडसेंचा नकार!

## » शरद पवारांबरोबर पुण्यात बैठकीनंतर स्पष्टीकरण

।भोसरी। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**जळगावमधील रावेर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार निश्चितीसाठी पुण्यातील मोदीबागेत सोमवारी खलबते रंगली. पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्यासह भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी, रवींद्र पाटील, श्रीराम पाटील यांनी शरद पवार यांची मोदीबागेत भेट घेतली. मात्र रोहिणी खडसे यांनी रावेरमधून निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे जाहीर केले. जयंत पाटील यांनीही इच्छुकांबरोबर चर्चा झाली असून, मंगळवारी निर्णय जाहीर केला जाईल, असे सांगितले.**





रावेर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या स्नूषा, विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून कोण उमेदवार असेल, याबाबत दावे-प्रतिदावे सुरू झाले होते. त्यातच एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे याही निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे रावेर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीचा तिढा वाढला होता.या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या पुण्यातील मोदीबाग या निवासस्थानी दुपारी खलबते रंगली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह रोहिणी खडसे यांनी इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. त्यानंतर रोहिणी खडसे यांनी निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. रावेरमधील उमेदवाराच्या नावाची घोषणा मंगळवारी केली जाईल. या मतदारसंघातून माझ्या उमेदवारीचा प्रश्नच येत नाही. इच्छुकांसाठी मी आग्रही असून यासंदर्भात शरद पवार आणि जयंत पाटील यांच्यासमवेत चर्चा झाली आहे. त्यानुसार उमेदवाराचे नाव जाहीर केले जाईल.एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती वेगवेगळ्या पक्षात ही नवीन गोष्ट नाही. त्यामुळे काही संभ्रम असण्याचे कारण नाही. एकनाथ खडसे यांचा भाजप प्रवेश हा त्यांचा सन्मान की अगतिकता, याचे उत्तर तेच देऊ शकतील. मी कोणाच्या विरोधात प्रचार करणार नाही. तर माझा प्रचार माझ्या पक्षासाठी असेल, असे रोहिणी खडसे यांनी सांगितले. वडील दुसऱ्या पक्षात गेले, याचे निश्चितच वाईट वाटते.

भाजपच्या महिला उमेदवाराच्या विरोधात महिलेलाच रिंगणात उत्तरविल्यास तुल्यबळ लढत होऊ शकते, असा विचार करून शरद पवारांकडून महिला उमेदवार दिला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे गुंतवणूक सल्लागार ज्ञानेश्वर बढे यांच्या पत्नी डॉ. तृप्ती बढे यांचे नाव शुक्रवारी अचानक पुढे आले. शिवाय, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार संतोष चौधरी यांनीही शरद पवार यांची भेट घेत उमेदवारीसाठी तयारी दाखवली आहे. जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांच्यापेक्षा हे रावेर मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला (शरदचंद्र पवार गट) लेवा समाजातीलच एखाद्या नव्या चेहऱ्याची प्रतिक्षा होती. त्या दृष्टीने चाचपणी दोन दिवसांपासून सुरू होती. शुक्रवारी मुंबईत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची बैठक झाली. यावेळी माजी आमदार संतोष चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र नाना पाटील यांनी शरद पवारांची भेट घेत निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे. शनिवारी डॉ. तृप्ती बढे या देखील शरद पवार यांच्या भेटीसाठी जाण्याची शक्यता आहे.

### जयंत पाटील यांच्यासमवेत चर्चा

» वेर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या स्नूषा, विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून कोण उमेदवार असेल, याबाबत दावे-प्रतिदावे सुरू झाले होते. त्यातच एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे याही निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे रावेर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीचा तिढा वाढला होता.या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या पुण्यातील मोदीबाग या निवासस्थानी दुपारी खलबते रंगली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह रोहिणी खडसे यांनी इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. त्यानंतर रोहिणी खडसे यांनी निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. रावेरमधील उमेदवाराच्या नावाची घोषणा मंगळवारी केली जाईल. या मतदारसंघातून माझ्या उमेदवारीचा प्रश्नच येत नाही. इच्छुकांसाठी मी आग्रही असून यासंदर्भात शरद पवार आणि जयंत पाटील यांच्यासमवेत चर्चा झाली आहे.

# करदात्यांना 24 कोटींची भरघोस कर सवलत!

## साडेतीन लाख करदात्यांनी घेतला लाभ, सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांची माहिती

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध सवलतींचा शहरातील साडेतीन लाख करदात्यांनी लाभ घेतला आहे. या करदात्यांना तब्बल 24 कोटी 32 लाख रुपयांची कर सवलत मिळाली आहे, अशी माहिती कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.**






शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळा जमीन, मिश्र यासह विविध अशा 6 लाख 25 हजार मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर संकलन विभागाच्या वतीने कर वसूल करण्यात येतो. 2023-24 या आर्थिक वर्षात 6 लाख 25 हजार मालमत्तांपैकी 5 लाख 11 हजार 154 मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. गतवर्षी या विभागाने 816 कोटींचा कर वसूल केला होता. यंदा तब्बल 161 कोटींचा अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. महापालिकेच्या वतीने करदात्यांना आगाऊ कर भरल्यास, ऑनलाईन आगाऊ भरणा केल्यास, महिलांच्या नावावर मालमत्ता असल्यास करात सवलत, दिव्यांग, माजी सैनिक, शौर्य पदक धारक, पर्यावरण पूरक सोसायटी, पर्यावरण पूरक खासगी शैक्षणिक संस्था अशा विविध प्रकारे करामध्ये सवलत देण्यात येते.

### 16 हजार 132 सदनिका धारकांना पर्यावरण पूरक सवलतींचा मिळाला लाभ..

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झिरो वेस्ट प्रकल्प राबवून पर्यावरणासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या शहरातील 16 हजार 132 सदनिका धारकांना तब्बल 71 लाख रुपयांची घसघशीत अशी मिळकत कराच्या सामान्य करातून सवलत मिळाली आहे.

> करदात्या नागरिकांना करांमध्ये विविध सवलती देण्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्रेसर आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी कर भरण्याची अंतिम मुदत 31 मे 2024 पर्यंत आहे. गत वर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांनी आपल्या कराचा भरणा करून संबंधित लागू असलेल्या सवलतींचा लाभ घ्यावा.
> – शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### असा घेतला लाभ..

» रोख अथवा धनादेशाद्वारे आगाऊ कर भरणा करणाऱ्या 86 हजार 252 मालमत्ता धारकांना 3 कोटी 45 लाख, ऑनलाईन आगाऊ कर भर भरणा करणाऱ्या 2 लाख 45 हजार 253 जणांना सर्वाधिक 15 कोटी 62 लाख, मालमत्ता महिलांच्या नावावर असल्यामुळे 12 हजार 559 महिलांना 2 कोटी 14 लाख, 1257 दिव्यांगांना 3 लाख, 3 हजार 452 माजी सैनिकांना 2 कोटी 8 लाख रुपयांची भरघोस अशी करातून सवलत मिळाली आहे.

---

# मनसेच्या गुढी पाडवा मेळाव्यास पिंपरी-चिंचवडमधून 3 हजार कार्यकर्ते होणार रवाना!

## शहराध्यक्ष सचिन चिखले यांची माहिती

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दरवर्षीप्रमाणे येत्या ०९ एप्रिल रोजी मुंबई येथे शिवतीर्थावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने गुढीपाडवा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यासाठी मनसे सज्ज झाली असून पिंपरी चिंचवड शहरातून तब्बल तीन हजार कार्यकर्ते रवाना होणार असल्याची माहिती मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिली आहे.**



याबाबत सचिन चिखले यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मनसेचा मेळावा शिवाजी पार्कवर होणार आहे. या मेळाव्याची मनसे सैनिकाकडून जय्यत तयारी सुरु आहे. मेळाव्यासाठी पिंपरी पिंपरी चिंचवड मनसे शहराध्यक्ष, उपशहराध्यक्ष, विभागाध्यक्ष व विविध विंगचे शहराध्यक्ष यांनी संपूर्ण शहर पिंजून काढून प्रभागा-प्रभागात बैठका पार पाडल्या.यावेळी २०० चारचाकी वाहने, १०० बसेस रवाना होणार आहेत. यात तब्बल दोन ते तीन हजार मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते व चाहतावर्ग येणार आहे.

दरम्यान, देशातील लोकसभेच्या निवडणूका जवळ आल्या आहेत. त्यामुळे या गुढीपाडवा मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या मेळाव्याला संबोधित करताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे काय बोलणार? मनसेची युती होणार की नाही? निवडणुकीबाबत मनसेची भूमिका काय असेल? मनसे लोकसभा लढणार किंवा नाही? अशा निर्माण झालेल्या असंख्य प्रश्नांना राज ठाकरे काय उत्तर देणार? याकडे संपुर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागले आहे.

# बिजलीनगर, चिंचवड परिसरात संजोग वाघेरे यांचा गावभेट दौरा

## हस्तांदोलन, शुभेच्छांनी गावभेटी दौऱ्याचा वाढला उत्साह

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



गद्दारांना गद्दारी काय असते याचा धडा शिकविण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व कार्यकर्ते व सामान्य मतदार आता सज्ज झाला आहे. त्यांच्या पराभवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी वाट पहावी लागणार असल्याचे संजोग वाघेरे-पाटील यांनी सांगितले. आज सोमवारी सकाळी झालेल्या वाल्हेकरवाडी – रावेत गावभेट दौऱ्यात ते मतदारांशी संवाद साधत होते. त्यावेळी त्यांनी विश्वास व्यक्त केला. या वेळी सेल्फी, हस्तांदोलन अन शुभेच्छांनी गावभेटी दौऱ्याचा उत्साह वाढला होता.


या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) मुख्य प्रवक्ते माधव पाटील,(Chinchwad) सागर चिंचवडे, गणेश भोंडवे, कामगार आघाडीचे संदीप शिंदे, राहुल धनवे, आम आदमी पार्टीचे शहर संघटक सचिन पवार, कमलेश रनावरे, वैजनाथ शिरसाठ, रोहित सरनोबत, भरत दास, दगडूछ मरळे, माथाडी कामगार संघटनेचे हनुमंत तरडे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, पदाधिकारी, युवा कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


वाघेरे पाटील म्हणाले की, तरुणांना नोक-या नाहीत आजचा तरुण बेरोजगार झाला आहे. देश देशोधडीला लागला आहे, शेतक-यांचा विषय गंभीर आहे. कामगारांना न्याय मिळत नाही त्यामुळे मतदारांनी जागे झाले पाहिजे. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. शहरी आणि गावातील प्रश्नांना न्याय देण्यासाठी मी पूर्ण पर्यंत करणार असल्याचे मावळ लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, मतदारांकडून आणि जेष्ठ नागरिक, तरुणांकडून उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचे मनापासून स्वागत केले. अडीअडचणीत असलेल्या सर्वसामान्यांना मदतीचा हात देणारं नेतृत्व आणि समाजाची असलेलं नाळ अश्या भावना या वेळी मतदारांनी व्यक्त केल्या.

---

# थेरगाव मध्ये स्कूल बसला आग, जीवितहानी झाली नाही





। पिंपरी । महाईन्यूज

थेरगाव मधील दगडू पाटील नगर येथे रस्त्याच्या बाजूला पार्क केलेल्या स्कूल बसला आग लागली. ही घटना सोमवारी (दि. 8) सायंकाळी सव्वा सात वाजताच्या सुमारास घडली. सुदैवाने जीवित हानी झाली नाही.

अग्निशमन दलाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी (दि. 8) सव्वा सात वाजताच्या सुमारास पिंपरी-चिंचवड अग्निशमन विभागाला कुणाल कारकूड यांनी दगडू पाटील नगर थेरगाव येथे स्कूल बसला आग लागल्याची माहिती दिली. त्यानुसार थेरगाव उप अग्निशमन केंद्राचे सीनियर फायरमन मनोज मोरे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाणी मारून बसची आग विझवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र बसचे मोठे नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही.

कस्पटे वस्ती, वाकड येथे गवताला आग लागली. ही घटना सोमवारी (दि. 8) दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली. अजय कस्पटे यांनी अग्निशमन विभागाला माहिती दिली.


# पहिली ‘बहुउद्देशीय’ चिप!



## भूमिका

**१९७० मध्ये, म्हणजे स्थापनेनंतर केवळ दोन वर्षांच्या आतच, इंटेलने सेमीकंडक्टर चिपनिर्मिती क्षेत्रात ‘मेमरी चिप’चं एक नवं दालन उघडलं होतं. अधिकाधिक विदेच्या साठवणुकीची वाढती गरज सहजपणे पुरवू शकणाऱ्या मेमरी चिपची मागणी उत्तरोत्तर वाढतच जाणार, याची नॉइस आणि मूर या इंटेलच्या संस्थापकांना खात्री होती.**

त्याचबरोबर विदासंचय करणं हे मेमरी चिपचं एकच एक असं व्यापक उद्दिष्ट असल्यामुळे तिची निर्मिती करणं हे इंटेलच्या ‘मास मॅन्युफॅक्चिरग’ अर्थात घाऊक उत्पादन करण्याच्या धोरणाशी सुसंगतही होतं. केवळ दोन वर्षांत मिळवलेल्या अशा नेत्रदीपक यशामुळे कोणत्याही नवउद्यमी कंपनीचा संस्थापक सुखावला असता. पण इंटेलचा रॉबर्ट नॉईस मात्र बेचैन आणि काहीसा अस्वस्थ होता.व्यावसायिक कारणांसाठी इंटेलने ‘डीरॅम’ मेमरी चिपनिर्मितीची कास धरली असली तरीही भौतिकविज्ञानातला हाडाचा संशोधक असलेल्या नॉईसचा कल हा खरा ‘लॉजिक चिप’च्या निर्मितीकडेच होता. शॉकली सेमीकंडक्टरपासून फेअरचाइल्ड सेमीकंडक्टपर्यंतच्या दशकभरापेक्षाही अधिक काळच्या प्रवासात नॉईसनं केवळ लॉजिक चिप संरचना आणि निर्मितीवरच काम केलं होतं. त्यामुळेच तोवर जरी लॉजिक चिपची निर्मितीप्रक्रिया तिच्या उपयोजनाप्रमाणे विभिन्न असली तरीही ‘बहुउद्देशीय’ स्वरूपाच्या लॉजिक चिपची निर्मिती करून या प्रक्रियेचं प्रमाणीकरण (स्टॅण्डर्डायझेशन) कसं करता येईल या विचारानं नॉईस आणि त्याच्यासह इंटेलमध्ये काम करणारे काही अभियंते झपाटले होते.सुदैवानं लॉजिक चिप निर्मिती प्रक्रियेच्या प्रमाणीकरण प्रकल्पावर अधिकृतरीत्या काम करण्याची संधी इंटेलकडे लगेच चालून आली. त्या काळात सुलभ आणि जलद गणनक्रियांसाठी ‘पॉकेट कॅलक्युलेटर’ हे उपकरण जगभरात लोकप्रिय होत होतं आणि जपानी कंपन्यांनी त्याच्या उत्पादनात आघाडी घेतली होती. निपॉन कॅलक्युलेटिंग मशीन कॉर्पोरेशन ही जपानी कंपनी (जिचं पुढे ‘बिजीकॉम’ असं नामकरण झालं) त्या वेळी ‘१४१-पीएफ’ या गणनक्रियेबरोबर छपाईदेखील करू शकणाऱ्या कॅलक्युलेटर निर्मितीच्या प्रकल्पात गुंतली होती. जपानी कंपन्यांनी जरी कॅलक्युलेटर उत्पादनात आघाडी घेतली असली तरीही त्याच्या परिचालनासाठी लागणाऱ्या चिपसाठी त्यांची भिस्त संपूर्णपणे अमेरिकी चिप-उत्पादक कंपन्यांवरच होती. निपॉननं आपल्या १४१-पीएफ कॅलक्युलेटरसाठी लागणाऱ्या चिपच्या निर्मितीसाठी इंटेलशी बोलणी सुरू केली. निपॉनच्या अभिकल्पकारांच्या (डिझायनर) आरेखनानुसार त्यांना या कॅलक्युलेटरसाठी बारा प्रकारच्या चिपची (प्रामुख्यानं लॉजिक व थोडया मेमरी) गरज लागणार होती. सुरुवातीपासूनच इंटेलनं आपलं सर्व लक्ष हे केवळ ‘डीरॅम’ मेमरी चिपनिर्मितीवरच केंद्रित केलं होतं; त्यात तिला यशही मिळत होतं. अशा वेळेला हे कंत्राट पदरात पाडून घेण्यासाठी आपल्या धोरणाशी विसंगत निर्मिती प्रक्रिया असणाऱ्या लॉजिक चिपच्या निर्मितीत पाऊल टाकणं कितपत योग्य आहे हा प्रश्न इंटेलच्या नेतृत्वाला पडला होता.येत्या दशकात कॅलक्युलेटर व तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणांची आणि पर्यायानं ही उपकरणं चालवणाऱ्या चिपची मागणी भूमितीश्रेणीनं वाढत जाणार आहे याची नॉईसला खात्री होती. या क्षेत्राच्या जडणघडणीच्या काळापासूनच इंटेलचा त्यात सहभाग असायला हवा हे तो जाणून होता. म्हणूनच कितीही आव्हानं असली तरीही त्यांचं परिवर्तन संधीत कसं करता येईल या विचारानं नॉईसला झपाटून टाकलं. टेड हॉफ या अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेच्या संगणक अभियंत्याला हाताशी घेऊन नॉईसनं, निपॉनला हव्या असलेल्या आरेखनात प्रमाणीकरणाच्या दृष्टीनं काय बदल करता येतील याचं विश्लेषण करायला सुरुवात केली. सखोल विश्लेषण आणि चर्चाच्या अनेक फेऱ्यांनंतर त्यांना चिप संरचनेच्या दृष्टिकोनातून दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या.(अ) कॅलक्युलेटर किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण असो,करून ठेवणारी ‘रीड ओन्ली मेमरी’ किंवा ‘रॉम’ चिप, (३) विदेचा तात्पुरता किंवा दीर्घकाळपर्यंत संचय करणारी तसंच त्यांच्यावर प्रक्रिया करणारी ‘रँडम ॲक्सेस मेमरी’ अर्थात रॅम चिप, आणि (४) मूळ उपकरणाचं इतर पूरक उपकरणांशी संधान बांधून देणारी (उदा. कॅलक्युलेटरला प्रिंटरशी जोडणारी) ‘इनपुट/आउटपुट’ किंवा ‘आय/ओ’ चिप!




## संपादकीय »

### नरसंहाराची नशा!

***काय साध्य केल्यावर आपण थांबायचे याचेच उत्तर मुख्य आक्रमकाकडे नाही आणि काही साध्यही होताना दिसत नाही अशी इस्रायल-हमास युद्धाची गत..***

वसंत ऋतूत वनातील मोह वृक्षांस बहर येतो आणि सारा परिसर मोह-फुलांच्या मादक गंधाने भरून जातो. जंगलातील हत्ती त्या मोह-फुलांच्या गंधाने वेडेपिसे होतात आणि त्यातला एखादा गजराज त्या मोहमद्याच्या अतिसेवनाने सगळे भान हरपून कमालीचा हिंसक होतो आणि विध्वंस करू लागतो. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांचे वर्तन हे अशा मद्यपी हत्तीसारखे आहे. फरक इतकाच की त्यांना बेभान करणारा मोह हा झाडांवर फुलणारा नैसर्गिक नाही आणि त्याला फुलवण्यास नागरिकांचा तीव्र विरोध इत्यादी कारणांनी संत्रस्त नेतान्याहू यांना हा राजकीय मोह फुलवण्याची संधी ‘हमास’ या दहशतवादी संघटनेने दिली. त्या घटनेस ७ एप्रिल या दिवशी, सहा महिने झाले. त्या दिवशी ऑक्टोबरात भल्या पहाटे हमासच्या दहशतवाद्यांनी बेसावध इस्रायलवर नृशंस हल्ला करून १२०० जणांचे प्राण घेतले.

एकीकडे लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू आहे, तर दुसरीकडे सूर्य आग ओकत आहे. राज्याच्या काही भागांत एप्रिल महिन्याच्या आधीपासूनच पारा ४२ अंशापर्यंत गेला. त्यात महावितरणने नवीन आर्थिक वर्ष चालू होत असताना वीज ग्राहकांना वीज दरवाढीचा शॉक देत घाम फोडला आहे.

## वीज दरवाढीचे चटके कमी करण्याचा विचारच नाही?



१ एप्रिल २०२४ पासून राज्यातील महावितरणच्या सर्व ग्राहकांचा स्थिर आकार वाढणार आहे. यात इंधन अधिभार जोडल्यास ग्राहकांवर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा पडण्याचा अंदाज आहे.राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ रोजीच्या आदेशानुसार ही दरवाढ होत आहे. महावितरण कंपनीने आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी वीज ग्राहकांवर आर्थिक भार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. अशी लोकांत चर्चा आहे. वाढलेले वीज दर १ एप्रिलपासून लागू करण्यात आले आहेत. पण वाढीव वीज दर ग्राहकांच्या माथी एकदा मारण्यात आले की, ते पुन्हा कमी होण्याची शक्यता नाही. असेच समजून चालायचे आणि उपयोग केलेल्या विजेचे आलेले देयक भरत राहायचे. राज्य वीज नियामक आयोगाने मार्च-२०२३ मध्ये दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत दरवाढ मंजूर केली होती. त्यानुसार १ एप्रिल २०२३ च्या तुलनेत १ एप्रिल २०२४ पासून सर्वच संवर्गातील ग्राहकांचा स्थिर आकार वाढेल. सामान्य नागरिक कायम हाच विचार करतो की, उन्हाळ्याचे विशेषतः एप्रिल – मे हे दोन महिने आणि पावसाळा लांबल्यास जूनचे काही दिवस विजेचा उपयोग जास्त होईल. त्यामुळे येणाऱ्या वाढीव वीज देयकाची कळ निमूटपणे सोसायची.वेळेत वीज देयक भरणारे ग्राहक म्हणजे. महावितरणला सहकार्य करणारे ग्राहक! उपयोग केलेल्या विजेचे देयक वेळेतच भरले पाहिजे, याची जाण त्यांना असते. हा त्यांचा प्रामाणिकपणा आहे. याउलट वीज देयक थकवणारी बडी धेंडे म्हणजे महावितरणलाच शॉक देणारे फुकटे होय. उपयोग करत असलेली वीज आपल्यासाठी फुकटच आहे, हा कुसंस्कार त्यांच्या मनावर बिंबला आहे. या फुकट्यांकडून तसेच आकडे टाकून वीज वापरणाऱ्या लबाडांकडून दंडासह वीज देयक वसूल करण्याला पर्याय नाही. यांचे ओझे प्रामाणिक जनतेने का वाहायचे ? वीज देयकाची वसुली करण्यास गेलेल्या महावितरणच्या कर्मचारी वर्गावर प्राणघातक आक्रमणे झालेली आहेत. हे ही विसरता नये. सामान्य लोकांची उष्णतेने होणारी होरपळ ही त्यांची कठीण परीक्षाच असते. दारोदारी निवडणूक प्रचार – उमेदवारांना वाढीव वीज दराविषयी प्रश्न का विचारू नये ? ऐन उन्हाळ्यात वीज दर वाढवणे म्हणजे ग्राहकांची जाणीवपूर्वक केलेली थट्टा. वीज नियामक आयोगाच्या शिफारसीकडे वीज दरवाढी संदर्भात बोट दाखवायला विसरले जात नाही.आठवणीने त्यांच्या शिफारसीचे पालन केले जाते. इतका वक्तशीरपणा, काटेकोरपणा पाहून अजिबात आश्चर्य वाटत नाही. कारण हा सर्व खेळ महसूल गोळा करण्याच्या संदर्भातील आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मैत्री, नातं-गोतं, भावकी बाजूला ठेवा!

## विरोधी उमेदवाराला भेटायला जाऊ नका; अजित पवारांची तंबी

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या महायुती आणि महाविकास आघाडीचा जोरदार प्रचार सुरु आहे. उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्यातील दिग्गज नेते ठिकठिकाणी सभा, मेळावे घेत आहेत. या पार्श्वभूमीवर आज मावळ लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची सभा पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना चांगलीच तंबी दिली.**




उमेदवाराला भेटायला जाऊ नका, अन्यथा मी ऐकूण घेणार नाही. महायुतीचा धर्म पाळा', अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिल्या."मावळ लोकसभा मतदारसंघात आपल्याला महायुतीचा उमेदवार निवडून आणायचा आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आपण अनेकांना ओळखतो. आपल्या विरोधातील उमेदवाराचे आणि आपले अनेक वर्षांपासूनचे संबंध आहेत. मात्र, माझी सर्व महायुतीच्या कार्यकर्त्यांना आग्रहाची विनंती आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व सहकाऱ्यांना विनंती आहे की, १३ तारखेचे मतदान होईपर्यंत कोणालाही भेटायला जाऊ नका. दादा सहज गेलो होतो, गप्पा मारायला गेलो होतो, गप्पा नको आणि टप्पा नको. मैत्री नातं-गोतं भावकी-रावकी बाजूला ठेवा. महायुतीचा धर्म पाळा", अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले, "समोरचा उमेदवार सांगेल दादांनीच मला पाठवलेय. दादांनीच मला उभा राहा म्हणून सांगितलेय. पण हे धांदात खोटे आहे. संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे की, मी स्पष्ट आणि खरा बोलणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे कुठल्याही गोष्टीवर विश्वास ठेवू नका. धनुष्यबाण ऐके धनुष्यबाण हे चिन्ह आपल्याला मावळमध्ये चालवायचे आहे", असे अजित पवार म्हणाले. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निर्णय घेण्याची क्षमता आपण पाहिली. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ताकद देण्याचे काम आपल्याला करायचे आहे. यामध्ये आपण मागे राहता कामा नये. विरोधकांकडून आरोप होत आहे की, संविधान बदलण्याचे काम होत आहे. पण कुठेही संविधान बदलण्याचे काम झाले नाही. १० वर्षात कुठेही संविधान बदलण्याचे काम झाले नाही, विरोधक वाटेल ते बोलत आहेत", असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला.'विरोधी पक्षाच्या उमेदवाराला भेटायला जाऊ नका, अन्यथा मी ऐकूण घेणार नाही. महायुतीचा धर्म पाळा', अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिल्या."मावळ लोकसभा मतदारसंघात आपल्याला महायुतीचा उमेदवार निवडून आणायचा आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आपण अनेकांना ओळखतो. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या महायुती आणि महाविकास आघाडीचा जोरदार प्रचार सुरु आहे. उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्यातील दिग्गज नेते ठिकठिकाणी सभा, मेळावे घेत आहेत. या पार्श्वभूमीवर आज मावळ लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची सभा पार पडली.

### मी खरा बोलणारा कार्यकर्ता

» उमेदवाराला भेटायला जाऊ नका, अन्यथा मी ऐकूण घेणार नाही. महायुतीचा धर्म पाळा', अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिल्या."मावळ लोकसभा मतदारसंघात आपल्याला महायुतीचा उमेदवार निवडून आणायचा आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आपण अनेकांना ओळखतो. आपल्या विरोधातील उमेदवाराचे आणि आपले अनेक वर्षांपासूनचे संबंध आहेत. मात्र, माझी सर्व महायुतीच्या कार्यकर्त्यांना आग्रहाची विनंती आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व सहकाऱ्यांना विनंती आहे की, १३ तारखेचे मतदान होईपर्यंत कोणालाही भेटायला जाऊ नका. दादा सहज गेलो होतो, गप्पा मारायला गेलो होतो, गप्पा नको आणि टप्पा नको. मैत्री नातं-गोतं भावकी-रावकी बाजूला ठेवा. महायुतीचा धर्म पाळा", अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले, "समोरचा उमेदवार सांगेल दादांनीच मला पाठवलेय. दादांनीच मला उभा राहा म्हणून सांगितलेय. पण हे धांदात खोटे आहे. संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे की, मी स्पष्ट आणि खरा बोलणारा कार्यकर्ता आहे.

# ...कारण आम्ही उलटे टांगतो : योगी आदित्यनाथ

## नितीन गडकरींच्या प्रचारसभेत योगी आदित्यनाथांचे विधान

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सात वर्षांत उत्तर प्रदेशात एकही दंगल झालेली नाही. कारण दंगा करणाऱ्यांना हे चांगले माहिती आहे की उलटे टांगले जाईल, असे विधान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.**



नागपूर लोकसभेचे उमेदवार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रचारासाठी पश्चिम नागपूर परिसरात आयोजित जनसभेला संबोधित आदित्यनाथ बोलत होते.आज उत्तरप्रदेशात संचारबंदी लागत नसून कावड यात्रा काढली जाते. आधी मुली बाहेर राज्यात शिक्षणासाठी जायच्या. मात्र आता अपराधी, गुंड हे राज्य सोडून गेले आहेत. सर्वांसाठी सुरक्षित वातावरण आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात आज विविध भागांमध्ये सभा घेताना ज्यांनी रामाला आणले त्यांनाच सत्तेत आणण्याचा निर्धार जनतेने केल्याचे दिसून येत आहे. आज मोदींच्या नेतृत्वात देशात राष्ट्रवादी सरकार असल्याने ५०० वर्षांचा वनवास संपून राम मंदिर उभे राहिले. याआधी प्रत्येक होळीच्या सणाला 'होली खेले रघुवीरा अवध मे..' हे गाणे वाजत होते. मात्र, यावर्षी पहिल्यांदा रामलल्ला खऱ्या अर्थाने अयोध्येत होळी खेळले. हा आमच्यासाठी भाग्याचा क्षण असून मोदी सरकारच हे करू शकते, असेही आदित्यनाथ म्हणाले. या सभेला नितीन गडकरी, माजी आमदार सुधाकर देशमुख, परिणय फुके, माजी महापौर संदीप जोशी, दयाशंकर तिवारी आदींची उपस्थिती होती.यादरम्यान मोदी सरकारच्या विविध योजनांची माहितीही त्यांनी दिली. नितीन गडकरी यांनीही मतदारांना संबोधित केले.नितीन गडकरी यांनी नागपूरसह संपूर्ण देशात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या. इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत भारताची चर्चा जगभरात होऊ लागली आहे. देशाने गेल्या दहा वर्षांमध्ये जी प्रगती केली त्यात नितीन गडकरी यांचे योगदान मोठे आहे. गडकरींनी केवळ नागपुरात नाही संपूर्ण देशात पायाभूत सुविधांचा विकास केला आहे. त्यांच्याकडे नाही हा शब्दच नाही. प्रत्येक राज्यांना त्यांनी कोट्यवधींचा निधी देऊन कामे केलीत.

### गुंड हे राज्य सोडून गेले

» राजकारणात गडकरींविषयी कुणीही नकारात्मक बोलत नाही. गडकरी हे राजकारणातले अजातशत्रू आहेत. नागपूरकरांना असे खासदार मिळणे ही नशिबाची गोष्ट असल्याचेही आदित्यनाथ म्हणाले. नागपूर लोकसभेचे उमेदवार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रचारासाठी पश्चिम नागपूर परिसरात आयोजित जनसभेला संबोधित आदित्यनाथ बोलत होते.आज उत्तरप्रदेशात संचारबंदी लागत नसून कावड यात्रा काढली जाते. आधी मुली बाहेर राज्यात शिक्षणासाठी जायच्या. मात्र आता अपराधी, गुंड हे राज्य सोडून गेले आहेत.

# तोट्यातील कंपन्यांकडून कोट्यवधींचे दान!

## नफ्याच्या 93 पट देणग्या”, निवडणूक रोख्यांवरून आपचे आरोप

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गेल्या दिड महिन्यांपासून देशभरात निवडणूक रोख्यांचा विषय चर्चेत आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर भारतीय स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांबाबतचा संपूर्ण तपशील निवडणूक आयोगाकडे सादर केला. त्यानंतर न्यायालयाच्या निर्देशांनुसार निवडणूक आयोगाने सर्व तपशील त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. या तपशीलांद्वारे निवडणूक रोख्यांबाबतची बरीचशी माहिती समोर आली आहे. त्यानुसार देशात गेल्या पाच वर्षांमध्ये जितके निवडणूक रोखे वटवण्यात आले त्यापैकी जवळपास ५० टक्के निवडणूक रोखे एकट्या भारतीय जनता पार्टीने वटवले आहेत. यामधले बरेचसे रोखे हे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान वटवण्यात आले आहेत.




निवडणूक रोख्यांबाबतच्या आयोगाने दिलेल्या माहितीनुसार १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ या काळात एसबीआयने तब्बल २२ हजार २१७ निवडणूक रोख्यांची विक्री केली. त्यातील सर्वाधिक म्हणजेच ८ हजार ६३३ निवडणूक रोखे (४६.७४%) एकट्या भाजपाने वटवले आहेत. यातून भाजपाला १२,७६९ कोटी रुपये मिळाले आहेत. भाजपाला मिळालेल्या निवडणूक रोख्यांवरून आतापर्यंत अनेक आरोप झाले आहेत. ज्या कंपन्यांवर सक्तवसुली संचालनालय (ईडी), आयकर विभाग (आयट) आणि केंद्रीय गुन्हे अन्वेशन विभागाने (सीबीआय) धाडी टाकल्या आहेत. या धाडींनंतर काहीच दिवसांनी या कंपन्यांनी निवडणूक रोखे खरेदी केले आहेत आणि हे निवडणूक रोखे नंतर भाजपाने वटवल्याचे आरोप विरोधकांनी केले आहेत. यातच आता आम आदमी पार्टीने नवी माहिती सादर केली आहे.आपचे खासदार संजय सिंह यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेतून सिंह यांनी भाजपावर गंभीर आरोप केले. सिंह म्हणाले, भाजपाला निधी देणाऱ्या कंपन्यांच्या यादीतल्या ३३ कंपन्या अशा आहेत ज्यांचं गेल्या सात वर्षांमध्ये १ लाख कोटी रुपयांचं नुकशान झालं आहे, मात्र त्याच कंपन्यांनी भाजपाला ४५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. भाजपाला निधी देणाऱ्या कंपन्यांच्या यादीत १७ कंपन्या अशा आहेत ज्यांनी एकही रुपयांचा कर दिलेला नाही अथवा त्यांना करात सवलत मिळाली आहे. यापैकी ६ कंपन्या अशा आहेत ज्यांनी भाजपाला ६०० कोटी रुपयांची देणगी दिली आहे. यामध्ये एक कंपनी अशी आहे ज्या कंपनीने त्यांना जितका नफा झाला आहे त्याच्या तीन पटीने अधिक निधी दिला आहे. किती दिलदार कंपनी आहे पाहा... या यादीत एक कंपनी अशी आहे ज्या कंपनीने त्यांच्या नफ्याच्या तब्बल ९३ पट निधी दिला आहे. तर ३ कंपन्या अशा आहेत ज्यांनी कर भरलेलाच नाही, मात्र भाजपाला २८ कोटी रुपयांचा निधी दिला आहे.निवडणूक रोख्यांबाबतच्या आयोगाने दिलेल्या माहितीनुसार १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ या काळात एसबीआयने तब्बल २२ हजार २१७ निवडणूक रोख्यांची विक्री केली. त्यातील सर्वाधिक म्हणजेच ८ हजार ६३३ निवडणूक रोखे (४६.७४%) एकट्या भाजपाने वटवले आहेत. यातून भाजपाला १२,७६९ कोटी रुपये मिळाले आहेत. भाजपाला मिळालेल्या निवडणूक रोख्यांवरून आतापर्यंत अनेक आरोप झाले आहेत. ज्या कंपन्यांवर सक्तवसुली संचालनालय (ईडी), आयकर विभाग (आयट) आणि केंद्रीय गुन्हे अन्वेशन विभागाने (सीबीआय) धाडी टाकल्या आहेत. या धाडींनंतर काहीच दिवसांनी या कंपन्यांनी निवडणूक रोखे खरेदी केले आहेत आणि हे निवडणूक रोखे नंतर भाजपाने वटवल्याचे आरोप विरोधकांनी केले आहेत. यातच आता आम आदमी पार्टीने नवी माहिती सादर केली आहे.आपचे खासदार संजय सिंह यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली.

### नफ्याच्या तब्बल 93 पट निधी दिला

» मात्र त्याच कंपन्यांनी भाजपाला ४५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. भाजपाला निधी देणाऱ्या कंपन्यांच्या यादीत १७ कंपन्या अशा आहेत ज्यांनी एकही रुपयांचा कर दिलेला नाही अथवा त्यांना करात सवलत मिळाली आहे. यापैकी ६ कंपन्या अशा आहेत ज्यांनी भाजपाला ६०० कोटी रुपयांची देणगी दिली आहे. यामध्ये एक कंपनी अशी आहे ज्या कंपनीने त्यांना जितका नफा झाला आहे त्याच्या तीन पटीने अधिक निधी दिला आहे. किती दिलदार कंपनी आहे पाहा... या यादीत एक कंपनी अशी आहे ज्या कंपनीने त्यांच्या नफ्याच्या तब्बल ९३ पट निधी दिला आहे. तर ३ कंपन्या अशा आहेत ज्यांनी कर भरलेलाच नाही, मात्र भाजपाला २८ कोटी रुपयांचा निधी दिला आहे.गेल्या दिड महिन्यांपासून देशभरात निवडणूक रोख्यांचा विषय चर्चेत आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर भारतीय स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांबाबतचा संपूर्ण तपशील निवडणूक आयोगाकडे सादर केला. त्यानंतर न्यायालयाच्या निर्देशांनुसार निवडणूक आयोगाने सर्व तपशील त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. या तपशीलांद्वारे निवडणूक रोख्यांबाबतची बरीचशी माहिती समोर आली आहे. त्यानुसार देशात गेल्या पाच वर्षांमध्ये जितके निवडणूक रोखे वटवण्यात आले .

# खरगेंची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीची!

## अनुच्छेद 370वरून पंतप्रधान नरेंद्र मोदींची टीका

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अनुच्छेद ३७०च्या मुद्दयावरून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या वक्तव्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेस अध्यक्षांची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीसारखी आहे, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी रविवारी केला. तर काँग्रेसने राजकीय पक्ष म्हणून राहण्याचा नैतिक अधिकार गमावला असल्याचा दावा भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केला.

शनिवारी झालेल्या सभेत खरगे यांनी “जम्मू आणि काश्मीर व राजस्थानचा काय संबंध? राजस्थानात झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी अनुच्छेद ३७०बद्दल का बोलत आहेत, ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर का बोलत नाहीत?” अशी टीका केली होती. त्याला खरगे यांचे नाव न घेता मोदी यांनी उत्तर दिले.बिहारमधील नवादा येथील प्रचार सभेत बोलताना मोदी म्हणाले की, “काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांचे पद ही काही लहान बाब नाही. त्यांना असे वाटते की अनुच्छेद ३७०चा राजस्थानशी काहीही संबंध नाही. जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग नाही का? त्यांची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीसारखी आहे.” मोदी पुढे म्हणाले की, “इंडिया आघाडी राज्यघटनेविषयी बोलते.



त्यांच्या नेत्यांनी लोकांना सांगावे की त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जम्मू आणि काश्मीरमध्ये पूर्णपणे राबवता का आले नाही? हे करण्यासाठी मोदींची गरज का पडली?” या वेळी त्यांनी कर्नाटकचे काँग्रेस खासदार डी के सुरेश यांच्या स्वतंत्र दक्षिण भारताच्या विधानाचाही संदर्भ दिला. यावरून काँग्रेसची मानसिकता समजते असा दावा मोदींनी केला. भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी आरोप केला की, “काश्मीरच्या विलीनीकरणाचा इतर राज्यांशी काय संबंध असे जर काँग्रेस पक्ष म्हणत असेल तर त्यांना देशाच्या एकता आणि अखंडत्वासाठी घेतलेल्या शपथेविषयी कोणताही आदर नाही.” काँग्रेसने राष्ट्रीय पक्ष म्हणून स्थान जवळपास गमावलेच आहे, आता नैतिकदृष्ट्या त्यांनी राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वात उरण्याचाही अधिकार गमावला आहे.राजस्थानमधील जयपूर येथे शनिवारी झालेल्या सभेत खरगे यांनी “जम्मू आणि काश्मीर व राजस्थानचा काय संबंध? राजस्थानात झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी अनुच्छेद ३७०बद्दल का बोलत आहेत

### 370 चा राजस्थानशी संबंध नाही

» त्याला खरगे यांचे नाव न घेता मोदी यांनी उत्तर दिले.बिहारमधील नवादा येथील प्रचार सभेत बोलताना मोदी म्हणाले की, “काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांचे पद ही काही लहान बाब नाही. त्यांना असे वाटते की अनुच्छेद ३७०चा राजस्थानशी काहीही संबंध नाही. जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग नाही का? त्यांची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीसारखी आहे.” मोदी पुढे म्हणाले की, “इंडिया आघाडी राज्यघटनेविषयी बोलते. त्यांच्या नेत्यांनी लोकांना सांगावे की त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जम्मू आणि काश्मीरमध्ये पूर्णपणे राबवता का आले नाही?

# अक्षय कुमारला स्लिप डिस्कचा त्रास



खिलाडी' म्हणून प्रचलित असलेल्या सुपरस्टार अक्षय कुमारचा आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अक्षय व टायगर यांची जोडी सध्या अनेक मुलाखतींमध्ये पाहायला मिळतेय. त्यानिमित्तानं अक्षयनं एका चित्रपटातील आठवण शेअर केली आहे; ज्यात एका शूटिंगदरम्यान त्याला मोठी दुखापत झाली होती. १९९६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाच्या फाईट सीक्वेन्सच्या शूटिंगदरम्यान अक्षयला स्लिप डिस्कचा त्रास झाला होता. रणवीर इलाहाबादियाच्या यूट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अक्षय कुमारनं सांगितलं की, त्याला 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपट नेहमी लक्षात राहतो आणि यामागचं कारण हे नाही की तो चित्रपट सुपरहिट ठरला होता. तर याचं कारण हे आहे की, या चित्रपटामुळे अक्षयच्या पाठीला गंभीर दुखापत झाली होती.मुलाखतीत अक्षय म्हणाला, "मला आणि माझ्या पाठीला हा चित्रपट कायमचा लक्षात राहिला आहे. मी अंडरटेकर ही भूमिका बजावणाऱ्या एका रेसलरला उचललं होतं आणि त्याचं वजन ४२५ पाउंड म्हणजेच १९२ किलो होतं. मी तेव्हा वेडा झालो होतो. मी ठरवलेलं की, याला मी उचलणार."अक्षयनं तो स्टंट केला आणि सीन शूट झाला. तीन दिवसांनंतर त्याला जाणवलं की, पाठीत कसला तरी त्रास होतोय. तेव्हा त्याला 'स्लिप डिस्क'चा त्रास झाला असल्याचं कळलं.२०२१ रोजी 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाला २५ वर्षं पूर्ण झाली होती, तेव्हा अक्षयनं माहिती शेअर करून सांगितलं होतं की, या चित्रपटात स्टार रेसलर अंडरटेकर नसून ब्रायन लीनं त्याची भूमिका साकारली आहे.दरम्यान, अक्षय कुमारच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर,'बडे मियाँ छोटे मियाँ' या आगामी चित्रपटात अक्षय टायगर श्रॉफबरोबर झळकणार आहे. मानुषी छिल्लर, अलाया फर्निचरवाला, पृथ्वीराज सुकुमारन, रोनित रॉय यांच्याही महत्त्वाच्या भूमिका या चित्रपटात आहेत. ईदच्या मुहूर्तावर १० एप्रिलला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# ऐश्वर्या आणि धनुषने दाखल केला घटस्फोटाचा अर्ज

दाक्षिणात्य अभिनेता धनुष आणि सुपरस्टार रजनीकांत यांची लेक निर्माती ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत जानेवारी २०२२ मध्ये विभक्त होणार असल्याची माहिती दिली होती. यानंतर मध्यंतरी मुलांसाठी हे जोडपं पुन्हा एकत्र आल्याच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, आता या जोडप्याने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. इंडिया टुडेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऐश्वर्या आणि धनुष यांनी अलीकडेच चेन्नईच्या कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. कलम १३ ब अंतर्गत त्यांचा हा घटस्फोटाचा अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दोघांनी परपस्पर सहमतीने हा निर्णय घेतला असून या प्रकरणी काही दिवसांत सुनावणी करण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून ते वेगवेगळे राहत होते. यावर अद्याप या दोघांनीही प्रतिक्रिया दिलेली नाही.ऐश्वर्या आणि धनुष यांना दोन मुलं आहेत. त्यामुळे घटस्फोटानंतर मुलांची कस्टडी कोणाकडे जाणार याबाबत कोर्टाच्या सुनावणीत स्पष्टता दिली जाणार आहे. दरम्यान, दाक्षिणात्य अभिनेता धनुषने २०२२ मध्ये आपला १८ वर्षांचा संसार मोडत, पत्नी ऐश्वर्या रजनीकांतपासून वेगळं होण्याची घोषणा केली होती. त्याची पत्नी प्रसिद्ध अभिनेते रजनीकांत यांची मुलगी आहे. ऐश्वर्या आणि धनुष यांचं २००४ मध्ये झालं होतं. त्यांना यात्रा आणि लिंगा अशी दोन मुलं आहेत.सध्या धनुष आणि ऐश्वर्या आपल्या करिअरवर लक्ष केंद्रीत करत आहेत. 'लाल सलाम' या चित्रपटाचं दिग्दर्शन ऐश्वर्यानं केलं होतं. तर लवकरच धनुष एका बॉलीवूड चित्रपटात झळकणार आहे.दाक्षिणात्य अभिनेता धनुष आणि सुपरस्टार रजनीकांत यांची लेक निर्माती ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत जानेवारी २०२२ मध्ये विभक्त होणार असल्याची माहिती दिली होती. यानंतर मध्यंतरी मुलांसाठी हे जोडपं पुन्हा एकत्र आल्याच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, आता या जोडप्याने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. इंडिया टुडेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऐश्वर्या आणि धनुष यांनी अलीकडेच चेन्नईच्या कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. कलम १३ ब अंतर्गत त्यांचा हा घटस्फोटाचा अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दोघांनी परपस्पर सहमतीने हा निर्णय घेतला असून या प्रकरणी काही दिवसांत सुनावणी करण्यात येणार आहे.



# माझ्या आयुष्यात एकच दिशा

टायगर श्रॉफ 'बडे मियाँ छोटे मियाँ' या त्याचा आगामी चित्रपटाच्या तयारीत आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. टायगर आणि अक्षयने या चित्रपटाचं प्रमोशन वेगवेगळ्या शहरांत जाऊन अनोख्या पद्धतीनं केलंय. टायगरला त्याचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. अनेकदा टायगर आणि दिशाच्या रिलेशनबद्दल अफवा पसरल्या आहेत. परंतु, या विषयावर टायगरनं नेहमीच बोलायचं टाळलं आहे. एका मुलाखतीत त्यानं दिशाचा उल्लेख केला आहे.नुकत्याच 'टाइम्स नाऊ'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा टायगरला विचारण्यात आलं की, तू सिंगल आहेस का? तुझं आयुष्य कोणत्या दिशेला जातंय? त्यावर टायगरनं मजेशीर उत्तर दिलं. अभिनेता म्हणाला, "माझ्या आयुष्यात एकच दिशा आहे. हो आणि ते आहे माझं काम."दिशाबद्दलचा शब्दांचा हा खेळ 'बडे मियाँ छोटे मियाँ'च्या ट्रेलर लॉंचपासून सुरू झाला. जेव्हा अक्षय कुमारला विचारण्यात आलं होतं की, तो टायगरला काय सल्ला देऊ इच्छितो? तेव्हा अक्षय म्हणाला होता, "मी टायगरला एवढंच सांगेन की एकाच दिशेवर लक्ष केंद्रित कर." अक्षयच्या या वक्तव्याने सर्वत्र हशा पिकवला. टायगर श्रॉफ आणि 'दिशा पाटनी यांनी 'बेफिकरा', 'बाघी-२' अशा चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. तेव्हापासून ते एकमेकांना डेट करीत असल्याच्या अफवा सुरू झाल्या. २०२३ मध्ये त्यांचं ब्रेकअप झालाय अशा चर्चांनाही उधाण आलं होतं. परंतु, या दोन्ही गोष्टींवर टायगर किंवा दिशानं अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. दरम्यान, टायगर श्रॉफच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर जगन शक्ती यांच्या आगामी चित्रपटात टायगर झळकणार आहे. रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' चित्रपटात टायगर पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# शहनाज गिलने घेतलं सिद्धिविनायकाचं दर्शन

बॉलीवूड अभिनेत्री शहनाज गिल 'बिग बॉस-१३'मुळे चर्चेत आली. रिॲलिटी शोजनंतर 'किसी का भाई किसी की जान', 'थँक्यू फॉर कमिंग' अशा अनेक चित्रपटांमध्ये शहनाज झळकली शहनाजने आपल्या करिअरची सुरुवात म्युझिक व्हिडीओने केली. शहनाजने आतापर्यंत अनेक म्युझिक व्हिडीओजमध्ये काम केलं आहे. आज (८ एप्रिल रोजी) शहनाजचा नवाकोरा म्युझिक व्हिडीओ 'धुप लगदी' प्रदर्शित झाला आहे. या म्युझिक व्हिडीओची खासियत अशी की, 'धुप लगदी' हे गाणं स्वत: शहनाजने गायलं आहे. म्युझिक व्हिडीओच्या निमित्ताने या शुभकार्यासाठी शहेनाज सिद्धिविनायकाच्या चरणी पोहोचली आहे.



# राज कपूर अभिनेत्रीला मांडीवर बसवून सीन समजावून सांगायचे

रणजीत हे भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते आहेत. चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका साकारून त्यांनी लोकप्रियता मिळविली. त्यांनी ऑनस्क्रीन साकारलेल्या पात्रांसाठी त्यांना खूपदा खऱ्या आयुष्यात प्रेक्षकांची व कुटुंबियांची नाराजी सहन करावी लागली. 'एएनआय'ला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अभिनेते-चित्रपट निर्माते राज कपूर यांना त्यांच्या स्टुडिओमध्ये पहिल्यांदा भेटल्याची आठवण सांगितली. राज कपूर अभिनेत्रींना मांडीवर बसवून सीन समजावून सांगायचे, असं रणजीत म्हणाले. राज कपूर खऱ्या आयुष्यात जसे बोलायचे तसेच ते ऑनस्क्रीन बोलत होते, असं रणजीत यांनी सांगितलं. "मी त्यांच्या स्टुडिओत गेल्यावर तिथे त्याकाळच्या सर्व अभिनेत्रींचे मोठमोठे कटआउट्स पाहिले होते. एकदा ते स्टुडिओमध्ये आले आणि म्हणाले 'सॉरी गोली जी!' ते अतिशय सुंदर होते. त्यांचा रंग गोरा होता आणि त्याचे गाल लाल होते. त्यांचे डोळे खूपच सुंदर होते," अशी राज कपूर यांच्याबरोबरच्या भेटीची आठवण रणजीत यांनी सांगितली."मेरा नाम जोकर सिनेमातील अभिनेत्रीला राज कपूर यांनी मांडीवर बसवून सीन समजावून सांगितले होते, असं त्यांनीच आम्हाला सांगितलं होतं. ते प्रेमाने सीन समजावून सांगायचे, अभिनेत्रींशी अजिबात फ्लर्ट करायचे नाही. ते अभिनेत्रीला आपल्या मांडीवर बसायला सांगायचे तेव्हा तिला 'पुत्तर' (मुलगी) म्हणायचे," असं रणजीत म्हणाले. राज कपूर यांच्यासह 'मेरा नाम जोकर'मध्ये सिमी गरेवाल, ऋषी कपूर, केसेनिया रायबिन्किना, पद्मिनी, मनोज कुमार आणि धर्मेंद्र यांच्या प्रमुख भूमिका होत्या.

# चेन्नईने रोखला केकेआरचा विजयरथ!

## कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या 58 चेंडूत 67 धावा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील २२ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात पार पडला. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियवर खेळल्या गेलेल्या सामन्यात सीएसकेने कर्णधार ऋतुरात गायकवाडच्या अर्धशतकाच्या जोरावर केकेआरचा ७ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केकेआरने १३७ धावांचे लक्ष्य दिले होते, जे सीएसकेने १७.४ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले.**





रवींद्र जडेजा आणि तुषार देशपांडे यांच्या शानदार गोलंदाजीनंतर चेन्नई सुपर किंग्जने कर्णधार ऋतुराजने ५८ चेंडूत नऊ चौकारांच्या मदतीने खेळलेल्या ६७ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर केकेआरचा ७ गडी राखून पराभव केला. सलग दोन सामने गमावल्यानंतर, सीएसके आपल्या घरच्या मैदानावर विजयी ट्रॅकवर परतले. त्याचबरोबर केकेआरला या हंगामात पहिला पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना केकेआरने २० षटकांत ९ गडी गमावून १३९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात चेन्नईने १७.४ षटकांत ३ गडी गमावत १४१ धावा करून सामना जिंकला.सीएसकेच्या विजयात रचिन रवींद्रने १५ आणि डॅरिल मिशेलने २५ धावांचे योगदान दिले. चेन्नईने पहिल्या १० षटकात १ गडी गमावून ८१ धावा केल्या होत्या, ज्यामुळे त्यांच्यासाठी विजय मिळवणे सोपे झाले. कारण संघाला शेवटच्या १० षटकात ५७ धावा हव्या होत्या आणि त्यांच्या ९ विकेट्स शिल्लक होत्या.१३ व्या षटकात मिशेल बाद झाला असला, तरी त्यानंतर प्रभावशाली खेळाडू म्हणून फलंदाजीला आलेल्या शिवम दुबेने नेहमी प्रमाणे तुफानी शैलीत फलंदाजी करत सामना एकतर्फी केला. शिवम दुबेने १८ चेंडूत २८ धावांच्या स्फोटक खेळीत १ चौकार आणि ३ षटकार ठोकले. केकेआरच्या गोलंदाजीबद्दल बोलायचे झाले तर मिचेल स्टार्कची पुन्हा एकदा धुलाई झाली. सुनील नरेन आणि वैभव अरोरा यांच्याशिवाय केकेआरच्या एकाही गोलंदाजाला विकेट घेता आली नाही. तत्पूर्वा फिरकीपटू रवींद्र जडेजा आणि वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे यांच्या प्रत्येकी तीन बळींच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्जने कोलकाता नाईट रायडर्सला २० षटकांत ९ बाद १३७ धावांवर रोखले.

केकेआरसाठी कर्णधार श्रेयस अय्यरने ३२ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने ३४ धावांची सर्वोच्च खेळी खेळली. याशिवाय सुनील नरेनने २० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २७ धावा केल्या, तर त्याने अंगक्रिश रघुवंशीसह दुसऱ्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी केली. केकेआरच्या इतर फलंदाजांनी निराशा केली.आयपीएल २०२४ च्या २२ व्या सामन्यात चेन्नविरुद्धच्या सामन्यात कोलकाता संघाला यंदाच्या पराभव पत्करावा लागला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या कोलकाता संघाला चेन्नईने तुषार देशपांडे आणि रवींद्र जडेजाच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर २० षटकांत ९ बाद १३७ धावांवर रोखले. यानंतर प्रत्युत्तरात कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर १७.४ षटकांत ३ गडी गमावत १४१ धावा करून सामना जिंकला.

### डॅरिल मिशेलचे 25 धावांचे योगदान

» रवींद्र जडेजा आणि तुषार देशपांडे यांच्या शानदार गोलंदाजीनंतर चेन्नई सुपर किंग्जने कर्णधार ऋतुराजने ५८ चेंडूत नऊ चौकारांच्या मदतीने खेळलेल्या ६७ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर केकेआरचा ७ गडी राखून पराभव केला. सलग दोन सामने गमावल्यानंतर, सीएसके आपल्या घरच्या मैदानावर विजयी ट्रॅकवर परतले. त्याचबरोबर केकेआरला या हंगामात पहिला पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना केकेआरने २० षटकांत ९ गडी गमावून १३९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात चेन्नईने १७.४ षटकांत ३ गडी गमावत १४१ धावा करून सामना जिंकला. सीएसकेच्या विजयात रचिन रवींद्रने १५ आणि डॅरिल मिशेलने २५ धावांचे योगदान दिले.

# ‘तूही माझ्या स्ट्राईक रेटची खिल्ली उडवणार का?

## लखनौने विजयानंतर केएल राहुलचा शेअर केला भन्नाट व्हीडिओ

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**केएल राहुलच्या नेतृत्त्वाखालील लखनौ संघाने गिलच्या गुजरात टायटन्सला ऑल आऊट करत ३३ धावांनी शानदार विजय मिळवला. लखनौने १६४ धावांच्या लक्ष्याचा बचाव करत गुजरातच्या फलंदाजांना मैदानावर टिकू दिले नाही. आयपीएल इतिहासात प्रथमच लखनौन गुजरातचा पराभव केला. या सामन्यात लखनौ संघाचा कर्णधार आणि फलंदाज केएल राहुलने ३१ चेंडूत ३३ धावा केल्या. यासाठी संथ स्ट्राईक रेटने खेळत असल्याची टीका त्याच्यावर होत आहे. लखनौ संघाने सामन्यानंतर एक व्हीडिओ पोस्ट केला आहे, ज्यात केएलला संरक्षण मंत्री म्हणून संबोधले आहे, पण यामागचे कारण काय आहे, जाणून घ्या.**







सामन्यानंतरच्या व्हिडिओमध्ये एक व्यक्तीने केएल राहुलला संरक्षण मंत्री म्हणून संबोधले. यानंतर एलएसजीचा सलामीवीर केएल राहुलची प्रतिक्रिया पाहण्यासारखी होती. तू पण माझ्या स्ट्राईक रेटची खिल्ली उडवत आहेस का, असा सवालही केएल राहुलने त्याला विचारला. लखनौ सुपर जायंट्सने शेअर केलेला हा व्हीडिओ संघाच्या एका शानदार कामगिरी आणि विक्रमाबद्दलही सांगणारा आहे. या व्हीडिओमध्ये एक व्यक्ती केएल राहुलला म्हणते की, मला वाटते की तुम्ही भारताचे पुढील संरक्षण मंत्री व्हावे. यावर केएल राहुल म्हणतो की मित्रा, तूही माझ्या स्ट्राईक रेटची खिल्ली उडवणार का? त्यावर ती व्यक्ती म्हणाते, अरे नाही... तुम्ही नेहमीच १६० अधिक धावांच्या लक्ष्याचा यशस्वी बचाव करता, म्हणूनच मी तुम्हाला संरक्षण मंत्री म्हणत आहे. हा व्हीडिओ सोशल मिडियावर सध्या व्हायरल होताना पाहायला मिळत आहे. आयपीएलच्या इतिहासात तेराव्यांदा लखनौ संघाने १६० किंवा त्याहून अधिक धावांचे लक्ष्य राखले आहे. एवढ्या कमी कालावधीत इतर कोणत्याही संघाला अशी कामगिरी करता आलेली नाही.

लखनौ संघाचा आयपीएलमधील हा फक्त तिसरा हंगाम आहे. हीच माहिती या व्हीडिओमधून दिली आहे. लखनौचा संघ चांगली कामगिरी करत असला तरी केएल राहुलचा स्ट्राइक रेट चिंतेचे कारण आहे. आयपीएल २०१४ मध्ये त्याने आतापर्यंत १२६ धावा केल्या असून त्याचा स्ट्राइक रेट १२८.५७ आहे. एकदा तो अर्धशतक झळकावण्यात यशस्वी ठरला होता, पण त्या डावातही त्याने ४४ चेंडूत ५८ धावा केल्या. याशिवाय त्याने ९ चेंडूत १५ आणि १४ चेंडूत २० धावा केल्या आहेत.

### राहुलचा स्ट्राइक रेट 128.57

» आयपीएल २०२३ पासूनच केएलची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. २०२३ च्या हंगामातील काही सामने खेळल्यानंतर त्याला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो संपूर्ण टूर्नामेंटमधून बाहेर पडला. २०२३ च्या आयपीएलमध्ये राहुलने ९ सामन्यांमध्ये ११३.२२ च्या स्ट्राईक रेटने २७४ धावा केल्या होत्या, ज्यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश होता आणि त्याची सर्वात्कृष्ट धावसंख्या ही ७४ होती.आयपीएल २०१४ मध्ये त्याने आतापर्यंत १२६ धावा केल्या असून त्याचा स्ट्राइक रेट १२८.५७ आहे.